महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम १९८१ या कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी गस्ती नौका भाड्याने घेणेबाबत......

**महाराष्ट्र शासन**

**कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः मत्स्यवि-१११५/प्र.क्र.१७४/पदूम-१४**

मंत्रालय, विस्तार, मुंबई-४०० ००३२

तारीख: १ सप्टेंबर, २०१५

<u>वाचा-</u> शासन निर्णय कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विभाग क्रमांक मत्स्यवि १००१/ प्र.क्र.४६/ पदुम-१४, दिनांक १९ ऑक्टोबर, २००१

**<u>प्रस्तावना -</u>**

महाराष्ट्र राज्याच्या जलधि क्षेत्रात अवैध मासेमारी राखण्यासाठी, महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम,१९८१ मधील तरतदींनूसार, शासन निर्णय दिनांक १९ ऑक्टोबर,२००१ अन्वये मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, रायगड, रत्नागिरी व सिंधुदूर्ग या सागरी जिल्ह्यात, राज्याच्या सागरी हद्दीमध्ये गस्त घालण्यासाठी चार खासगी नौका भाड्याने घेण्यास मान्यता देण्यात आली आहे. राज्याच्या सागरी जलधि क्षेत्रात पारंपारिक मच्छिमार आणि पर्ससीन पद्धतीने बेकायदेशीर मासेमारी करणारे मच्छिमार यांच्यात कायम वाद होतात. तसेच रत्नागिरी, सिंधुदूर्ग जिल्ह्याच्या हद्दीत गोवा तसेच कर्नाटकातील मच्छिमार घुसखोरी करून मासेमारी करतांना आढळतात. परंतु या नौकांची इंजीन क्षमता तसेच वेग जास्त असतो. शासनाने भाडेतत्वावर घेतलेल्या गस्ती नौकांची इंजिन क्षमता १०० अश्वशक्ती व वेग ताशी ८ ते १२ सागरी मैल इतका असल्याने बऱ्याच वेळा पाठलाग करूनही अवैध मासेमारी नौका पकडण्यात यश येत नाही. त्यामुळे स्थानिक मच्छिमारांकडून शासनाकडे निवेदने प्राप्त होतात. त्यानुषंगाने गस्ती नौकांचा वेग वाढविणेसंदर्भात लोकप्रतिनिधी यांचेकडून शासनाकडे वारंवार पाठपूरावा करण्यात येतो. ही बाब विचारात घेऊन राज्य शासनामार्फत वेगवान गस्ती नौका खरेदी करून त्यावर कुशल मनुष्यबळ उपलब्ध करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधिन आहे. शासनामार्फत वेगवान गस्ती नौका खरेदी करण्यास आणखी काही कालावधी लागणार असून दरम्यान सन २०१५-१६ या वर्षातील मासेमारी हंगाम सुरू झाला असल्याने वेगवान गस्ती नौका भाड्याने घेण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी प्रचलित शासन निर्णयामध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय-**

महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम,१९८१ मधील तरतूदींनूसार, महाराष्ट्रातील पारंपारिक मच्छिमारांचे हित जोपासण्यासाठी तसेच राज्याच्या जलधि क्षेत्रातील अवैध मासेमारी

रोखण्यासाठी महाराष्ट्र राज्याच्या जलधि क्षेत्रात गस्त घालण्यासाठी सोबतच्या परिशिष्ट-अ मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तीनुसार पुढील प्रमाणे एकूण ५ गस्ती नौका भाड्याने घेण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे:-

| अ.क्र. | जिल्हा | गस्ती नौका संख्या |
|---|---|---|
| १ | ठाणे व पालघर | १ |
| २ | मुंबई व मुंबई उपनगर | १ |
| ३ | रायगड | १ |
| ४ | रत्नागिरी | १ |
| ५ | सिंधुदूर्ग | १ |

२. सदरहू गस्ती नौका भाड्याने घेण्यासाठी निविदा काढण्यास आयुक्त, मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. तसेच प्राप्त निविदांची छाननी करण्यासाठी पुढील प्रमाणे निविदा समिती गठीत करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | आयुक्त, मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य | अध्यक्ष |
| २) | उप सचिव, वित्त विभाग | सदस्य |
| ३) | उप सचिव, मत्स्यव्यवसाय | सदस्य |
| ४) | सह आयुक्त (सागरी) | सदस्य सचिव |
| ५) | सागरी अभियंता, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड | सदस्य |
| ६) | प्रादेशिक उपायुक्त, मत्स्यव्यवसाय, मुंबई | सदस्य |

३. सर्वसाधारण परिस्थितीत मासेमारी हंगाम संपल्यानंतर लगेचच पुढील मासेमारी हंगामासाठी निविदा प्रक्रीया सुरू करावी व १० जूलै पर्यंत निविदा प्रक्रीया पूर्ण करून निविदा समितीने छाननी केलेल्या निविदा अंतिम करण्यासाठी शासनास प्रस्ताव सादर करावा.

४. आयुक्त, मत्स्यव्यवसाय यांनी गस्ती नौकांच्या कामाचा नियमित आढावा घेऊन त्याबाबतचा अहवाल प्रत्येक तिमाही अखेर शासनास सादर करावा.

५. यावर होणार खर्च " मागणी क्रमांक डी-६, २४०५ मत्स्यव्यवसाय, १०३ सागरी मत्स्यव्यवसाय, (०१)(०१) सागरी मासेमारी नियमन (२४०५ ०२२६) " या लेखाशिर्षांतर्गत उपलब्ध असलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा.

६. सदर आदेश वित्त विभाग अनौपचारिक संदर्भ क्रमांक अनौसं ३२४/१५/व्यय-२, दिनांक २२.७.२०१५ अन्वये व वित्त विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५०९०११६१९१८२७०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानूसार व नावाने,

Nitin Madhavrao Pawar

Digitally signed by Nitin Madhavrao Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Desk Officer, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=79d1142b510b75c1201d04efa5ba4e48e243bd2014663c505a44a97e90266500, cn=Nitin Madhavrao Pawar
Date: 2015.09.01 16:22:37 +05'30'

**( नितीन पवार )**

**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) आयुक्त, मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य,मुंबई
२) सह आयुक्त (सागरी), आयुक्त, मत्स्यव्यवसाय यांचे कार्यालय,मुंबई
३) प्रादेशिक उपायुक्त, मत्स्यव्यवसाय, मुंबई
४) सर्व समिती सदस्य
५) सहाय्यक आयुक्त, मत्स्यव्यवसाय, मुंबई /मुंबई उपनगर/ ठाणे/ पालघर/ रायगड/ रत्नागिरी/ सिंधुदूर्ग,
६) वित्त विभाग (व्यय-२/अर्थसंकल्प),मंत्रालय, मुंबई-३२

**प्रत माहितीसाठी**

१) मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३) मा.उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
४) मा.मंत्री,पदुम यांचे खासगी सचिव
५) मा.राज्यमंत्री,मत्स्यव्यवसाय यांचे खासगी सचिव
६) सर्व विधीमंडळ सदस्य, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई
७) सचिव (पदूम) यांचे स्वीय सहायक
८) उपसचिव (मत्स्य) यांचे स्वीय सहायक
९) निवडनस्ती, पदुम१४

शासन निर्णय क्रमांक मत्स्यवि-१११५/प्र.क्र.१७४/पदूम-१४, दिनांक १ सप्टेंबर,२०१५ सोबतचे

## परिशिष्ट-अ

महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम,१९८१ या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी भाडयाने घ्यावयाच्या गस्ती नौकांच्या अटी, शर्ती व तांत्रिक तपशील:-

१) यांत्रिक नौका ट्रॉलर पध्दतीची असावी.

२) यांत्रिक नौकेची लांबी किमान ४५ फुट व रुंदी किमान १५ फुट असावी.

३) यांत्रिक नौकेची इंजिन क्षमता किमान २०० हॉर्सपॉवर आणि वेग मर्यादा किमान १२ नॉट इतकी असावी.

४) यांत्रिक नौकेवर बसण्यासाठी सुविधा असणारी १० X ७ X ६ फुट आकाराची केबिन असावी. एका वेळी आठ व्यक्ती बसतील एवढी जागा असावी. तसेच अल्पोपहारासाठी व चहापाणी करण्यासाठी जागा असावी. सर्व सोयींनी युक्त शौचालय असावे. नौकेवर प्रथमोपचार पेटी असावी.

५) नौकेवर विद्युत दिवे, सर्च लाईट, सिग्नल, इशाऱ्यासाठी भोगे ही यंत्र सामुग्री असावी.

६) नौकेवर नौकानयनासाठी संभाषणाची अद्यावत यंत्र सामुग्री जसे की, V.H.F., गस्ती दरम्यान गस्तीनौकेची स्थिती दर्शविणारी ग्लोबल पोझिशिनींग सिस्टीम G.P.S. बसविलेली असावी.

७) गस्ती नौकेवर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांसाठी लाईफ बोयीज, लाईफ जॅकेट, अग्नीशामक उपकरणे, वाळूने भरलेल्या दोन बादल्या असाव्यात.

८) नौका समुद्रात गस्तीसाठी सक्षम असल्याचे, सक्षम अधिकाऱ्याचे विधीग्राह्य प्रमाणपत्र ( Sea Worthiness Certificate) असणे आवश्यक राहील.

९) गस्ती नौकेचा कार्यकाल हा त्या त्या वर्षीच्या मासेमारी हंगामा पुरता म्हणजेच १ ऑगस्ट ते ३१ मे असा राहील.

१०) यांत्रिक नौकेस सागरी गस्तीचे काम एका दिवसात किमान आठ तास व महिन्यातून किमान २० दिवस राहील. तसेच आवश्यतेनुसार रात्रीसुध्दा गस्त घालावी लागेल. या कालावधीत गस्ती नौकेने किमान ५० नॉटीकल माईल अंतर कापणे बंधनकारक असेल. व त्याबाबतची नोंद ठेवणे आवश्यक राहील.

११) भाडयाने घेण्यात आलेल्या नौका आवश्यतेप्रमाणे विभागास उपलब्ध राहतील व सुस्थितीत राहतील याची जबाबदारी संबंधित कंत्राटदाराची राहील.

१२) सागरी मासेमारी नियमन अधिनियम, १९८१ अंतर्गत नौकेस मासेमारी परवाना तसेच नौका व खलाश्यांचे विमा संरक्षण असण्याची जबाबदारी ही संबंधित कंत्राटदाराची राहील.

१३) गस्ती नौकेवर आवश्यक असणाऱ्या सुविधा, इंधन खर्च, नौका दुरुस्ती व इंजिन दुरुस्ती या सारखे खर्च तसेच आवश्यकतेप्रमाणे तांडेल, खलाशी यांचे भोजन, चहापाणी व वेतन इत्यादी व्यवस्था नौका मालक / कंत्राटदार यांनी करावयाची आहे.

१४) भाडयाने दिलेली गस्ती नौका नादुरुस्त किंवा अपघातग्रस्त झाल्यास त्याची जबाबदारी शासनाची राहणार नाही. तसेच गस्तीसाठी पर्यायी नौका देण्याची जबाबदारी संबंधित कंत्राटदाराची राहील.

१५) गस्ती नौकेचे भाडे अदा करण्यास विलंब झाल्यास व्याजाच्या रकमेची मागणी करता येणार नाही.

१६) निविदा मंजूर झालेल्या नौका मालकास गस्ती नौकेच्या भाडेपट्टीबाबतचे करारपत्र करुन द्यावे लागेल.

१७) राष्ट्रीय सहकार विकास निगम योजनेअंतर्गत अर्थसहाय्य प्राप्त नौकामालक देखिल अर्ज करु शकतील.

१८) भाडयाने घेतलेल्या नौकेला गस्ती व्यतिरिक्त कोणतेही काम करता येणार नाही. (मासेमारी करता येणार नाही.)

-----------------